<u>पुढील सरतपास वादीतर्फे वकील श्री. एस. आर. ओगले यांचे मार्फत</u>

१५. (<u>निशाण २६/१ येथे आर.टी.एस. अपिल ४१/२००८ मधील अपिल मेमोची सहिसुद नक्कल आहे.</u> **सदर प्रकरण झाल्याचे तथ्य उभय पक्षकारांना मान्य आहे. त्यामुळे त्याला निशाण नं. १३९ देण्यात आले.**) (तद्नंतर निशाण २६/२ येथे आर.टी.एस. अपिल १०६/२०११ यामध्ये प्रतिवादी यांचा अपिल मेमो सादर करण्यात आलेला आहे. निशाण २६/३ येथे आरटीएस अपिल १०६/२०११ यामध्ये प्रतिवादी यांचा लेखी युक्तीवाद सादर करण्यात आलेला आहे. **सदर प्रकरण झाल्याचे तथ्य उभय पक्षकारांना मान्य आहे. त्यामुळे त्याला निशाण नं. १४० व १४१ देण्यात आले.**) **(**निशाण १२८/१ व १२८/२ या ठिकाणी मृत्युपत्र सादर करण्यात आलेले असून ती सदर साक्षीदाराच्या ताब्यातून सादर केलेली आहे. त्यावरील साक्षीदार मयत असल्याचे प्रस्तुत साक्षीदार सांगतात. सदर मृत्युपत्र ३० वर्षे जुने आहे असे देखील सदर साक्षीदार सांगत आहे. **तरी सदर तथ्यांचा योग्य तो पुरावा सादर करण्याच्या जबाबदारीवरती सदर मृत्युपत्रांना आता निशाण नं. १४२ व १४३ देण्यात आले.**) (<u>निशाण ४/६ येथे सादर केलेले मृत्युपत्र हे अन्य कामामध्ये सादर केलेले असल्यामुळे दुय्यम पुरावा म्हणुन ते मृत्युपत्र वाचण्यात यावे असे देखील साक्षीदाराने सांगितले आहे.</u> **मात्र दुय्यम पुरावा देण्याबाबत जे काही कारण घडलेले आहे याची योग्य अयोग्यता पडताळणी करुन ते मृत्युपत्र वाचता येईल किंवा कसे हे ठरविण्यात येईल. सबब, त्या मृत्युपत्राला निशाण १४४ देण्यात येते**.)

<u>उलटतपास प्रतिवादी नं. १तर्फे वकिल श्री. एस्. एन. भणगे</u>

१६. हे म्हणणे खरे आहे की निशाण १४२, १४३ व १४४ हे तीन्ही मृत्युपत्र करताना मी स्वत: हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की निशाण १४४ वरील असणा—या मृत्युपत्राची मुळ प्रत ही निश्चीत कोणत्या कामामध्ये हजर केली होती हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की त्या प्रकारचे मृत्युपत्र मिळविण्याचा प्रयत्न केला असे दर्शविणारा लेखी पुरावा माझेकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की निशाण १४२ ते १४४ वरील मृत्युपत्र झालेले नाही. ( <u>या प्रश्नाला वादीच्या वकिलांनी</u>

अशी हरकत घेतली की प्रतिवादी क्र. १ याने या कैफियतीमध्ये निशाण १४२ व १४३ वरील मृत्युपत्राचे अस्तित्व मान्य केलेले असल्यामुळे अस्तित्व नाकारण्या संदर्भात प्रश्न विचारता येणार नाही. प्रतिवादीच्या वकिलांनी असे सांगितले की, कैफियतीमध्ये मृत्युपत्राबाबत हरकत घेतलेली आहे. त्यांच्या कैफियतीमध्ये कागदातील मजकुर नमूद करुन उल्लेखाबबात कथन केलेले आहे. सबब, त्यामुळे तसे मृत्युपत्र होवून अधिकारांचे हस्तांतरण झाले हे तथ्य मान्य आहे असे दिसत नाही असे त्यांचे मत आहे. त्यामुळे मृत्युपत्राचे योग्यते अयोग्यतेबाबत प्रश्न विचारता येईल.)

१७. निशाण १४२ व १४३ वरील मृत्युपत्रामधील मजकुर मला मान्य आहे. मला याची माहिती नाही की हिराबाई हिचे वडिल व चुलते मयत झालेनंतर तिच आई व चुलती गुणवंती हिचे पटेनासे झाले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे दोघींच्यात त्यांच्या मिळकतीचे आपआपसात वाटप होवून हिराबाईची आई व चुलती वेगवेगळया राहू लागल्या. मला याची माहिती नाही की हिराबाईची आई आनंदी व चुलती गुणवंती यांनी काही मिळकती लेखाने शंकर गोविंद केळूसकर व नारायण विठठल अणसुरकर यांना दिलेल्या होत्या किंवा कसे.

१८. (साक्षीदाराला निशाण १४३ वरील मृत्यूपत्र दाखविण्यात आले.) मला हे माहिती नाही की सदर मृत्युपत्रानुसार गणवंती हिचे असे म्हणणे होते की त्या मृत्युपत्रातील मिळकती या १९६२ साली तिच्या एकट्याच्या मिळकती आहेत. हे म्हणणे खरे नाही की १९९२ सालात दावा मिळकती सुलोचना सखाराम भाटकर हिच्या स्वत:च्या मालकीच्या व कब्जाभोग्याच्या होत्या. मी पुन्हा सांगतो की मला माहिती नाही.

१९. (साक्षीदाराला निशाण २०/१ वरील करारपत्र दाखविण्यात आले.) या कराराने अ.क्र. २ ची मिळकत १०,०००/— रुपये किमतीस विक्रीत देण्याचा करार केला?

(या प्रश्नाला वादीच्या वकिलांनी हशी हरकत घेतली की सदर मिळकतीबाबत प्रतिवादी क्र. १ याने कोणतीही दाद मागितलेली नाही किंवा आपली असल्याचे कथन केलेले नाही. सदर तथ्य प्रतिवादी क्र. २ याने आपले कैफियतीत मांडलेले आहे. त्यामुळे

<u>प्रतिवादी क्र. १ याना त्याबाबत प्रश्न विचारता येणार नाही. प्रतिवादी क्र. १च्या वकिलांनी आपले कैफियतीत असे नमूद केलेले आहे की, दावा मिळकती या प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या काब्जाभोग्यात आहेत, त्यामुळे असा प्रश्न विचारता येईल. त्यावरुन असे दिसते की प्रतिवादी क्र. १ हे दावा मिळकत अ.क्र. २ हिचेशी संबंध असल्याचे सांगत आहेत. त्यामुळे तसा प्रश्न विचारता येईल.</u>)

मला सदर तथ्य मान्य नाही. **(मला सदर करार उलटतपासादरम्यान दाखविल्यामुळे त्याला ओळखण्यासाठी निशाण नं. १४५ देण्यात येते. )**

२०. (<u>साक्षीदाराला निशाण २०/२ वरील करारपत्र दाखविण्यात आले.</u>) या कराराने अ.क्र. २ ची मिळकत १०,०००/— रुपये किमतीस विक्रीत देण्याचा कराराचे पैसे स्विकारले व कब्जा दिला?

मला सदर तथ्य मान्य नाही. **(मला सदर करार उलटतपासादरम्यान दाखविल्यामुळे त्याला ओळखण्यासाठी निशाण नं. १४६ देण्यात येते. )**

२१. हे म्हणणे खरे नाही की सुलोचना हिने साक्षीदारांसमक्ष या दोन्ही करारावरती सहया केलेल्या आहेत. मला याची माहिती आहे की दोन्ही दावा मिळकती कुळपणाच्या आहेत. मला याची माहिती नाही की प्रांतांची परवानगी घेवून सदरच्या मिळकतींचे पुढे व्यवहार करण्याचे ठरले किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की आजदेखील अ.क्र. २ ची मिळकत प्रतिवादी क्र. २ यांच्या कब्जात आहे.

प्रश्न— प्रतिवादी क्र. २ पूर्वी अ.क्र. २ वरील मिळकतीमध्ये मोलमजुरी करत होते?
उत्तर— कधीतरी.

हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे सुलोचना हिने सदर अ.क्र. २ ची मिळकत प्रतिवादी क्र. २ याला विकली. हे म्हणणे खरे नाही की दाव्यातील मिळकती या सुलोचना हिच्या स्वतंत्र वाटपाने आलेल्या मालकी व कब्जाभोग्याच्या असल्याने वादीचे आजोबा रघुनाथ किंवा त्यांचे वारसांचा सदर मिळकतीकडे कोणत्याही प्रकरचा हक्कसंबंध नाही.

२२. हे म्हणणे खरे आहे की निशाण १३१ वरील प्रोबेट अर्जात दावा मिळकती समाविष्ट करण्यात आल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की दावा

मिळकतीकडे आमचा कोणत्याही प्रकारचा मालकी अगर कुळपणा नाही. हे म्हणणे खरे नही की सुलाचेनाच्या वाटणीस आलेल्या मिळकतीस आम्ही विनाकारण हक्क सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की दाव्यास कारण घडलेल्या बाबतची घटना नमूद केलेली आहे त्यावेळेस मी हजर नव्हतो. माझा जन्म मुंबईला झाला. माझे वडिल मुंबईला रहात होते व नोकरीला होते. माझे वडिल कॉलेजच्या शिक्षणावेळेस मुंबईला गेले होते. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतींची मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देता आहे.

**प्रतिवादी क्र. २ पुकारता गैरहजर. त्यांना एक संधी देण्यासाठी उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/—

दिनांक :— १२/११/२०१९.

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.